बांधकाम परवानगीसाठी ऑफलाइनचा आग्रह

आयुक्तांची संयुक्त कार्यशाळेची तयारी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : ऑनलाइन प्रणालीतील तांत्रिक अडचणी लक्षात घेता बांधकाम परवानगी, भू अभिन्यास प्रस्ताव ऑफलाइन सादर करण्यास परवानगी कायम ठेवावी, विकास शुल्क भरल्यानंतर मोकळ्या भूखंडावर कर आकारणी करू नये आणि जुन्या इमारतीच्या पुनर्विकासात ठाण्याच्या धर्तीवर वाढीव एफएसआय द्यावा, अशी मागणी नरेडको आणि क्रेडाई संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मनपा आयुक्त मनिषा खत्री यांच्याकडे केली. बांधकाम परवानगीच्या संदर्भात संयुक्त कार्यशाळा घेऊन प्रात्यक्षिकाची तयारी आयुक्तांनी दर्शविली.

महापालिकेत गुरुवारी मनपा आयुक्त मनिषा खत्री यांनी क्रेडाई, नरेडको, वास्तुविशारद आणि अभियंता आदी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावून त्यांच्या अडचणी, प्रश्न जाणून घेतले. यावेळी नरेडकोचे जयेश ठक्कर, सुनील गवांदे, शंतनू देशपांडे, पुरुषोत्तम देशपांडे, क्रेडाईचे सुरेश पाटील आदी उपस्थित होते. नगररचना विभागात बांधकाम परवानगीसाठी ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यात येणाऱ्या अडचणी मांडण्यात आल्या. बीपीएमएस प्रणालीत तांत्रिक त्रुटींमुळे प्रकरणे दाखल करून घेण्यात अडचणी येतात. महापालिकेने १६ ते २६ मार्च या कालावधीत ऑफलाईन प्रस्ताव सादर करण्यास परवानगी दिली होती. या कालावधीत सुमारे ११०० प्रस्ताव दाखल झाले. ऑफलाईन प्रस्ताव दाखल करण्याची मुदत पुढेही कायम ठेवण्याची मागणी करण्यात आली.

यावर आयुक्त खत्री यांनी मनपा अधिकारी आणि बांधकाम व्यावसायिकांची कार्यशाळा घेऊन तोडगा काढण्याची तयारी दर्शविली. भाडेतत्वावर दिलेल्या मालमत्तांवर वाढीव घरपट्टीचा भार पडणार नाही, याचे नियोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुनर्विकासात ठाण्याच्या धर्तीवर एफएसआय द्यावा

इमारतींच्या पुनर्विकासात ठाणे शहरात वाढीव म्हणजे ५० टक्के एफएसआय दिला जातो. नाशिकमध्ये तो ३० टक्के इतकाच आहे. ठाण्याच्या धर्तीवर तो वाढवून मिळावा, अशी मागणी नरेडकोच्या पदाधिकाऱ्यांनी केली. विकास शुल्क भरल्यानंतर मोकळ्या भूखंडावर कर आकारणी केली जाते. मालमत्ता भाडेतत्वावर देताना मालमत्ता कराचा मोठा भार पडतो. पुण्यात वाहनतळासाठी असणाऱ्या नियमाचा दाखला यावेळी दिला गेला. तिथे नऊ मीटर रस्त्यालगत नऊ मजली इमारतीत वाहनतळाचे दोन मजले मोजले जात नाहीत, याकडे लक्ष वेधत तशीच नियमावली नाशिकमध्ये करण्याची मागणी करण्यात आली.

मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यासाठी नाशिकमधून रसद

जिल्हाभरातून शेकडो वाहने नेण्याची तयारी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : कधीकाळी मुंबईत होणाऱ्या मनसेच्या मेळाव्यात स्थानिक पातळीवरून मोठी रसद पुरवली जात असे. तेव्हा मनसेचा नाशिक बालेकिल्ला होता. कालांतराने पक्षाला गळती लागली. आणि हा ओघ कमी होत गेला. यंदा रविवारी मुंबईत आयोजित गुढीपाडवा मेळाव्यात मोठी रसद पुरविण्याची तयारी स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केली आहे. जिल्ह्यातून १० हजार कार्यकर्ते शेकडो वाहनांमधून मुंबईला मार्गस्थ होतील, असा दावा केला जात आहे.

मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर, तयारीची माहिती प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, जिल्हाध्यक्ष रतनकुमार इचम, प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली. स्थानिक पदाधिकाऱ्यांनी १५ तालुके आणि शहरातील पंचवटी, नाशिकरोड, मध्य नाशिक, सातपूर व सिडको विभागात दौरे केले. पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. पुढील काळात नागरिकांच्या प्रश्नांवर पूर्णपणे लक्ष केंद्रीत करून सत्ताधाऱ्यांना जाब विचारला जाईल, असे पदाधिकाऱ्यांनी सूचित केले.

गुढीपाडवा मेळाव्याकडे सर्वांचे लक्ष आहे. कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे पाटील यांनी म्हटले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, महिला प्रदेशाध्यक्ष सुजाता डेरे उपस्थित होते. शहर व जिल्ह्यातून किमान १० हजार पदाधिकारी, कार्यकर्ते मुंबईत राज ठाकरे यांचे भाषण ऐकण्यासाठी जाणार आहेत. यासाठी ८०० ते १००० वाहनांचा ताफा निघणार आहे. यात बसेस आणि इतर चारचाकी वाहनांचा समावेश आहे. काही कार्यकर्ते रेल्वेने मुंबई गाठतील. रविवारी सकाळी आठ वाजता मनसेच्या राजगड कार्यालयातून वाहने मुंबईकडे निघणार असल्याचे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील यांनी सांगितले.

अंतर्नाद हिंदू नववर्ष निमित्त नाशिक महानगरपालिका आणि नववर्ष स्वागत यात्रा समिती यांच्या वतीने गोदाकाठी असलेल्या पटांगणावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी संगीत, तबला आणि नृत्य अशा अंतर्नाद आयोजन करण्यात आले होते.

कांदा व्यापाऱ्याची फसवणूक

नाशिक : मनमाड येथील कांदा व्यापाऱ्यास परजिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी सात लाखांहून अधिक रुपयांना फसविले. या प्रकरणी मनमाड पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

कृषिमंत्र्यांनी काही दिवसांपूर्वी जिल्हा पोलीस अधीक्षकांसह शेतकऱ्यांची बैठक बोलावत शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी मदतवाहिनी सुरू केली. शेतकऱ्यांची फसवणूक झाल्यास तातडीने जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, फसवणुकीविषयी पाठपुरावा करावा, अशा सूचना केल्या होत्या. शेतकऱ्यांमध्ये जागरूकता येत असून शेतकरी तक्रारीसाठी पुढे येऊ लागले आहेत.

मनमाड येथील गणेश अहिरे (३८) कांदा व्यापारी आहेत. २०२१ ते २०२२ मध्ये संशयित गौरव आहुजा (रा.अमरावती), साजीद शेख आणि खालीद शेख (रा. भंडारा), सुखदेव आडत, सुनील आडत आणि मंदार अडसूळ (रा. वेळापूर) यांनी अहिरे यांच्याशी कांदा खरेदी व्यापार केला. आहुजाने ९९४० किलो कांदा १६.२५ रुपये प्रतिकिलो भावाने खरेदी केला. एक लाख ४८ हजार ४३४ रुपयांचा कांदा खरेदी केला. परंतु, पैसे दिले नाहीत. खालीद आणि साजित शेख यांनी १० टन कांदा एक लाख ६४ हजार रुपयांना खरेदी केला. परंतु, पैसे दिले नाहीत. सुखदेव आडत, सुनील आडत यांनी ३०,२९० किलो कांदा दोन लाख ३९ हजारांना खरेदी केला. या कांदा खरेदी व्यवहारात एकाही व्यापाऱ्याने पैसे न दिल्याने अहिरे यांची फसवणूक झाली. त्यांनी मनमाड पोलीस ठाण्यात धाव घेतली.

मानेभोवती नाळ अडकल्याने बाळाचा मृत्यू

नाशिक : बाळाच्या मानेभोवती नाळेचे दोन वेढे घट्ट आवळले गेल्यानेच नवजात बालिकेचा मृत्यू झाल्याचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या आदेशाने स्थापन चौकशी समितीच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

जिल्हा शासकीय रुग्णालयात अलिकडेच प्रियंका बोडके (२३) यांना प्रसूतीसाठी दिंडोरी येथून संदर्भित करण्यात आले होते. त्यांना होणारा त्रास पाहता नातेवाईकांनी प्रियंकाची शस्त्रक्रिया करावी, अशी मागणी केली. परंतु, डॉक्टर हे प्रियंका यांच्या नैसर्गिक प्रसूतीची वाट पाहत राहिले. रात्री उशीरा प्रियंका यांना मुलगी झाली. मात्र, काही वेळातच तिचा मृत्यू झाला.

याप्रकरणी नातेवाईकांनी डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे हा मृत्यू झाल्याचा आरोप करत संबंधितांवर कारवाईची मागणी केली. जिल्हा शल्य चिकित्सकांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. नीलेश पाटील आणि आरोग्य विद्यापीठाचे काही अधिकारी यांची एकत्रित समिती स्थापन करण्याचे आदेश दिले.

महामार्गावरील प्रवास महागला

पिंपळगाव नाक्याच्या टोलमध्ये वाढ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील पिंपळगाव-नाशिक-गोंदे या टप्प्यातील सहापदरी मार्गावरील वाहनधारकांचा प्रवास आता महागणार आहे. टोलच्या सध्याच्या दरात मोटार, जीपसाठी ४.४४ टक्के तर, बस आणि मालमोटारीसाठी सव्वा तीन टक्के वाढ झाली आहे. एक एप्रिलपासून हे नवीन दर लागू होत आहेत.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणने पिंपळगाव टोल प्लाझावरून मार्गस्थ होणाऱ्या वाहनांसाठी नवीन दर जाहीर केले आहेत. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील गोंदे-नाशिक-पिंपळगाव या टप्प्यात ये-जा करणाऱ्या वाहनधारकांना पिंपळगाव नाक्यावर टोल भरावा लागतो. मुंबई, नाशिकहून पुढे मालेगाव, धुळे आणि परराज्यांत जाणारा आणि परराज्यांतून मुंबईकडे येणारा हा महामार्ग आहे. त्यावर वाहनांची मोठी वर्दळ असते. वाढीव टोलचा भार आता सर्व वाहनधारकांवर पडणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या माहितीनुसार सध्या केवळ पिंपळगाव टोल नाक्यावरील दरात वाढ केली. याच महामार्गावरील घोटीस्थित टोलच्या दरात कुठलीही वाढ झाली नसल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. राष्ट्रीय महामार्गावरील पिंपळगाव टोल नाक्यावर सध्या मोटार, जीप, व्हॅनसाठी (एका बाजूचा प्रवास) २२५ रुपये लागतात. एक एप्रिलपासून त्यामध्ये १० रुपयांनी वाढ होऊन आता २३५ रुपये मोजावे लागतील. मिनी बस, तत्सम वाहनांसाठी सध्या एका बाजूच्या प्रवासासाठी ३६५ रुपये टोल लागतो. तो आता ३८० रुपये होईल. मालमोटार आणि बससाठी एका बाजूच्या प्रवासाकरिता ७७० रुपयांऐवजी ७९५ रुपये घेतले जातील. तीन ॲक्सल वाणिज्य वाहनांसाठी सध्याचा ८४० रुपये (नवीन दर ८७०), हलके वाणिज्य वाहन व अवजड वाहन (चार ते सहा ॲक्सल) वाहने - १२०५ (१२५० रुपये) आणि सात वा त्यापेक्षा अधिक ॲक्सलच्या अजस्त्र कंटेनरसाठी १४७० (नवीन १५२० रुपये) असे दर असणार आहेत.

मालेगाव महापालिकेचे १०५५ कोटींचे अंदाजपत्रक मंजूर

गेल्या वर्षाच्या तुलनेत १४२ कोटी ४३ लाखांची विक्रमी वाढ

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : कोणतीही करवाढ नसलेल्या महापालिकेच्या १०५५ कोटींच्या अंदाजपत्रकास गुरुवारी आयुक्त तथा प्रशासक रवींद्र जाधव यांनी मंजुरी दिली. प्रशासकराज सुरू झाल्यापासून प्रशासकांनी मंजुरी दिलेले यंदाचे हे सलग तिसरे अंदाजपत्रक आहे.

२०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महापालिकेच्या लेखा विभागातर्फे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक नुकतेच प्रशासक जाधव यांच्याकडे सादर झाले होते. त्यावर चर्चा करण्यासाठी पालिका सभागृहात आयुक्त जाधव यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी विशेष सभा घेण्यात आली. जाधव यांनी काही दुरुस्त्या सुचवित या अंदाजपत्रकास अंतिम मंजुरी दिली. यावेळी सरत्या वर्षाच्या ९१२ कोटी ४८ लाखांच्या सुधारित अंदाजपत्रकालाही मंजुरी देण्यात आली. गेल्या वर्षाच्या तुलनेत १४२ कोटी ४३ लाखांची विक्रमी वाढ यंदाच्या अंदाजपत्रकात झाली आहे. शहर विकासासाठी काही वैशिष्ट्यपूर्ण कामे मार्गी लावण्याच्या दृष्टीने आर्थिक तरतूद करण्यात आल्याचेही दिसत आहे.

शहरात नव्याने बांधण्यात आलेल्या निवासी व व्यापारी मालमत्तांचे खासगी संस्थेद्वारा सर्वेक्षण सुरू आहे. या सर्वेक्षणानुसार आगामी वर्षापासून गृहकरात सुमारे ५० कोटींची वाढ होण्याची पालिका प्रशासनाला अपेक्षा आहे.

सौरऊर्जा प्रकल्पासह विविध कामांसाठी तरतूद

वीज देयकांचा आर्थिक भार टाळण्यासाठी महापालिकेच्या मुख्यालयासह पाच ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याचा प्रशासनाचा मानस आहे. त्या अनुषंगाने २० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. आगामी काळात महापालिकेची निवडणूक होईल, असे गृहीत धरून प्रभागात विकास कामे करण्यासाठी प्रत्येक नगरसेवकाला चार लाख याप्रमाणे एकूण तीन कोटींची तरतूद करण्यात आली आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक, मोसम नदी सुशोभीकरण, उद्यान विकास, कचरा संकलन, वाहनतळ निर्मिती, बांधा, वापरा व हस्तांतरित करा, या तत्त्वावरील प्रकल्प आदी कामांसाठीदेखील तरतूद करण्यात आली आहे.

स्मार्ट कंपनीविरोधात उच्च न्यायालयात याचिका

शहर काँग्रेसचा निर्णय

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : शहरात स्मार्ट सिटी योजनेंतर्गत विविध कामांवर आजवर खर्च झालेला प्रचंड निधी आणि त्यांचा दर्जा यात कमालीची तफावत दिसून येते. नाशिक महानगरपालिका -स्मार्ट सिटी कंपनीतील वादात शहराची अधोगती झाल्याचा आरोप करून काँग्रेसने स्मार्ट सिटी कंपनीविरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे.

स्मार्ट सिटी कंपनीच्या कारभाराविषयी महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रारी होत्या. मात्र, त्यांनी कुठलीही कारवाई केली नाही, असा आरोप पदाधिकाऱ्यांनी केला.

स्मार्ट सिटी कंपनीच्या भोंगळ कारभाराची माहिती शहर काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड, माजी गटनेते शाहू खैरे, शहर काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष वसंत ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

इतिवृत्ताविना बैठकीचे कामकाज

महानगरपालिका आणि स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांमधील अंतर्गत वाद शहराच्या अधोगतीचे महत्त्वाचे कारण ठरल्याचा आरोप माजी गटनेते शाहू खैरे यांनी केला. स्मार्ट सिटीच्या बैठकींचे इतिवृत्त आजपर्यंत लिहिले गेले नाही.

२१ कामांवर ८५० कोटी

इलेक्ट्रीक स्मशानभूमी, महात्मा फुले कलादालन आणि नेहरू उद्यान नूतनीकरण, महाकवी कालिदास कलामंदिर नूतनीकरण, पानवेली काढण्यासाठी ट्रॅश स्किमर यंत्र, स्मार्ट रस्ता, गोदावरी सुशोभिकरण, गोदावरीतील गाळ काढणे, स्वयंचलित दरवाजा, आपत्कालीन कक्ष स्थापना अशा एकूण २१ कामांसाठी ८५७.५० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाल्याची माहिती काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. प्रचंड निधी मिळाल्यानंतरही निकृष्ट दर्जाची कामे झाल्याचा त्यांचा आक्षेप आहे.

तयार गुढींना ग्राहकांची पसंती

साडेतीन मुहुर्तांपैकी एक महत्त्वाचा मुहुर्त असलेल्या गुढीपाडव्यानिमित्त विविध प्रकारच्या तयारी गुढींनी बाजारपेठ सजली आहे .

नाशिक : मराठी नववर्षानिमित्ताने घरोघरी गुढी उभारण्याची परंपरा वर्षानुवर्षे रुजली आहे. पारंपरिक गुढी सजविण्यासाठी लागणारा वेळ आणि कसरत हे धावपळीच्या काळात अनेकांसाठी त्रासदायक ठरते. गुढीला लागणारे सामान घेण्यासाठी होणारी फिरफिर, घरी तयार करायला लागणारा वेळ पाहता बाजारपेठेत तयार गुढी तसेच विविध कापडांपासून तयार केलेले वस्त्र उपलब्ध झाले आहे. विशेष म्हणजे ग्राहकांची पसंती मिळत आहे.

हिंदू नववर्षाचा पहिला दिवस म्हणजे गुढीपाडवा. या दिवशी पारंपरिक पध्दतीने महावस्त्र, सोवळे, नवी साडी यापैकी कुठलेही एक वस्त्र गुढीसाठी घेतले जाते. बांबुच्या काठीचा आधार घेत साखरेचा तसेच फुलांचा हार, कडुनिंबाचा पाला आणि कलश याच्या मदतीने गुढी उभारण्यात येते. बऱ्याचदा गुढी उभारतांना तसेच ती बांधतांना कलश पडणे, वस्त्र सटकणे, असे प्रकार घडत असतात. काहींना ही कसरत करायला वेळ नसतो. अशा स्थितीत गुढी तयार करण्यासाठी लागणारा वेळ वाचावा, यासाठी बाजारपेठेत विविध साहित्य विक्रीसाठी दाखल झाले आहे.

गुढीसाठीच्या तयार वस्त्राचाही त्यात समावेश आहे. खण, शाही मस्तानी, नऊवारी, पैठणी अशा विविध रंगातील आकर्षक तयार वस्त्र आहेत. या वस्त्रांच्या किंमती १५० ते ५०० रुपयांपर्यंत आहेत. यामध्ये खणाच्या कापडापासून तयार केलेल्या वस्त्रांना सर्वाधिक पसंती असल्याचे दिसत आहे. यासह तयार मोत्यांची तसेच लाकडाच्या ठशांची, मंगल चिन्हांचा वापर करत तयार रांगोळी तसेच सहा इंचापासून तीन फुटापर्यंत तयार गुढीदेखील बाजारात दाखल झाली आहे.

उंच गुढी उभारण्याची परंपरा अद्यापही काही घरांमध्ये कायम असली तरी, वाढत्या उंचीच्या इमारती, खिडकी किंवा सज्जा यातील अपुरी जागा यामुळे गुढीचा आकारही लहान होत आहे. दुसरीकडे नववर्ष स्वागत यात्रेत सहभागी होतांना आकर्षक गुढी नेता यावी, यासाठी लहान आकाराच्या गुढींना अधिक पसंती मिळत आहे. या तयार गुढींच्या किंमती १०० ते २५० रुपयांपर्यंत असल्याचे त्रिमूर्ती वस्तु भंडारच्या वृषाली शौचे यांनी सांगितले. साखरेचे हारकडे २० रुपयांपासून पुढे विक्रीसाठी आहेत. लहान मुलांसाठी हारकडे घेणाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे.

दरम्यान, यंदा नववर्ष स्वागत यात्रा समितीच्या वतीने अहिल्यादेवी होळकर तसेच छत्रपती संभाजी महाराज बलिदान मास याचे औचित्य साधत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यंदा तयार गुढीसह गुढीपाडव्याला निघणाऱ्या नववर्ष स्वागतयात्रेत सहभागी होण्यासाठी महिलांकडून पारंपरिक नऊवारी, पेशवाई तसेच अन्य नऊवार तयार साड्या, ठुशी, चंद्रहार, बोरमाळ, चंद्रकोर, बांगड्या, पाटल्या, गोट अशा दागिन्यांना मागणी आहे.

असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लि., (आर्सिल) CIN- U65999MH2002PLC134884 | वेबसाइट : https://auction.arcil.co.in
Arcil Premier ARC
विविध आर्सिल ट्रस्टसचे ट्रस्टी म्हणून काम पाहणारे
आर्सिल कार्यालय : दि रुबी, दहावा मजला, २९, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ मधील नियम ६, ८ व ९सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी अधिनियम) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत ऑनलाइन ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीसाठी जाहीर सूचना

याद्वारे कर्जदार/ जामीनदार/ गहाणकार आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की, विविध आर्सिल ट्रस्ट्सचे ट्रस्टी म्हणून काम पाहणाऱ्या असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लिमिटेड (''**आर्सिल**'')कडे तारण/ भाग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तांची (नोंदणीकृत अभिहस्तांकन करारान्वये वित्तीय मत्तांचे अभिहस्तांकन केल्यानंतर) सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ (''नियम'')मधील नियम ६, ८ व ९ सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ मधील तरतुदीच्या अनुषंगाने खाली दिल्यानुसार थकबाकी रकमेच्या पुढील व्याज, शुल्के व खर्च इ.सह वसुलीसाठी ऑनलाइन ई-लिलावाच्या माध्यमातून ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''उपाय नाही'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

अ. क्र.	कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ गहाणकारांचे नाव	कर्ज खाते क्र. व विक्रेती बँक	ट्रस्टचे नाव	०८.१२.२०२२ रोजीच्या सरफेसी सूचनेनुसार थकबाकी रक्कम	ताब्याचा प्रकार आणि दिनांक	पाहणी दिनांक व वेळ	मालमत्तेचा प्रकार व क्षेत्रफळ	बयाणा रक्कम	आरक्षित किंमत	ई-लिलावाचा दिनांक व वेळ
१.	कर्जदार : श्रीमती जयश्री अविनाश अगस्ते	कर्ज खाते क्र.: ०४९४७९१००० ०००१९५ डीबीएस बँक	आर्सिल-रिटेल लोन पोर्टफोलिओ-०७३-बी-ट्रस्ट	०८.१२.२०२२ रोजीनुसार रु. १३,४८,४०३.९२/- (रुपये तेरा लक्ष अठ्ठेचाळीस हजार चारशे तीन आणि ब्याण्णव पैसे फक्त) + त्यावरील दि. २२.१०.२०२१ पासूनचे पुढील व्याज + कायदेशीर खर्च	२०.०१.२०२५ रोजी प्रत्यक्ष ताबा	१७.०४.२०२५	१७९.९७ चौ.फू. (चटई क्षेत्रफळ व फ्रीहोल्ड)	रु. १,५३,०००/- (रुपये एक लक्ष त्रेपन्न हजार फक्त)	रु. १५,३०,०००/- (रुपये पंधरा लक्ष तीस हजार फक्त)	२९.०४.२०२५ रोजी दु. १२.०० वा.

लिलावात काढलेल्या अनामत मत्तेचा तपशील : मालक श्रीमती जयश्री अविनाश अगस्ते
दुकान क्र. सी, तळमजला, अंबिका रेसिडेन्सी, पूज्य श्री श्री रविशंकर मार्ग, फेम सिनेमाच्या मागे, रायन इन्टरनॅशनल स्कूलजवळ, टागोर नगर, वडाळा गाव, नाशिक-४२२ ००६.

आर्सिल यांना ज्ञात असलेले प्रलंबित दावे	निरंक	आर्सिल यांना ज्ञात असलेले बोजे/थकबाकी	निरंक
बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक	त्याच दिवशी लिलावाच्या २ तास आधी	बोलीवृद्धी रक्कम	बोली दस्तावेजात नमूद केल्याप्रमाणे
डिमाण्ड ड्राफ्ट यांच्या नावे काढण्यात यावा	आर्सिल रिटेल लोन पोर्टफोलिओ-०७३-बी-ट्रस्ट	येथे देय : मुंबई	
आरटीजीएसचे तपशील	खाते क्र. : ५७५००००००९०३४५२, बँकेचे नाव : एचडीएफसी बँक, आयएफएससी कोड : HDFC0000542, शाखेचा पत्ता : कमला मिल्स कम्पाऊण्ड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल-४०० ०१३.		
संपर्क व्यक्तीचे नाव व क्रमांक	शैलेश गायकवाड- ९८६७९२९१२१ (Shailesh.gaikwad@arcil.co.in), महेश बंगेरा- ९००४१७३२५६ (Mahesh.bangera@arcil.co.in), मोनिका रुद्र दास- ९८१९८०२२८४ (monica.rudra@arcil.co.in), दीपक शिंदे- ९६३७४०८८६६ (deepak.shinde@arcil.co.in)		

अटी व शर्ती :
१. सदर लिलाव विक्री ही https://auction.arcil.co.in या वेबसाइटच्या माध्यमातून आणि बोली प्रपत्रात नमूद करण्यात आलेल्या पद्धतीने त्यात दिलेल्या अटी व शर्तीनुसार राबविण्यात येत आहे.
२. इंटरनेट सेवा, नेटवर्कमधील अडचणी, सिस्टम कोसळणे, वीजपुरवठा खंडित होणे इ.साठी प्राधिकृत अधिकारी ("AO")/ आर्सिल जबाबदार नसतील.
३. लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर कुठलेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता AO बोली/ प्रस्ताव स्वीकारू/ नाकारू/ त्यात बदल करू/ तो रद्द करू शकतात किंवा लिलाव पुढे ढकलू शकतात.
४. लागू कायद्यानुसार अनामत मत्ता आपल्या नावे करून घेण्यासाठी भरावयाची वैधानिक थकबाकी, कर, शुल्के, खरेदी रकमेवरील लागू जीएसटी, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ.चा भरणा करण्याची जबाबदारी यशस्वी खरेदीदार/ बोलीदारांची असेल.
५. इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्याअगोदर अनामत मत्तेवर परिणाम करू शकणारे आर्सिलसह इतरांचे बोजे, अनामत मत्तेचा मालकी हक्क आणि दावे/ हक्क/ थकबाकी इ.बाबत स्वतंत्र चौकशी करावी. सदर लिलाव जाहिरात म्हणजे आर्सिलचे प्रतिनिधित्व किंवा वचन नसून तसे समजण्यात येऊ नये. तिसऱ्या पक्षाद्वारे करण्यात येणारे दावे/ हक्क/ थकबाकीची मागणी इ.साठी आर्सिलचे प्राधिकृत अधिकारी जबाबदार नसतील.
६. वर्तमानपत्रात प्रकाशित लिलाव सुचनेमधील तपशील निम्नस्वाक्षरीकारांच्या माहितीनुसार खरा आहे; परंतु त्यात काही चूक झाल्यास, चुकीचे विधान करण्यात आल्यास किंवा काही गाळण्यात आल्यास त्यासाठी निम्नस्वाक्षरीकार जबाबदार नसतील.
७. सदर थकबाकीचा भरणा करण्याचे दायित्व असलेल्या कर्जदार/ जामीनदार/ गहाणकारांनी ही विक्री सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्समधील नियम ८ व ९ अंतर्गत असलेली वर नमूद लिलाव विक्री राबविण्यात येणार असल्याची सूचना समजावी.
८. वर नमूद लिलाव कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाल्यास, सदर अधिनियम आणि नियमांमधील नियम ८(५)च्या तरतुदींतर्गत अनामत मत्तेची इतर पद्धतींनी विक्री करण्याचा अधिकार आर्सिल यांना आहे.

स्वा./-
प्राधिकृत अधिकारी
असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लि.
शाखा : नाशिक
दिनांक : २८.०३.२०२५